**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**दिनांक २५ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

**1. केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचं आवाहन**

**2. प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणी करिता उत्तम प्रकल्प संरचना तसेच अधिकाऱ्यांचे परफॉर्मन्स ऑडिट महत्त्वाचं असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन**

**3. राज्यातल्या भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिस्तरीय समित्यांची स्थापना**

**आणि**

**4. विदर्भात उच्चांकी उष्णतामान; आज अकोला, अमरावती मध्ये उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट**

**आता सविस्तर बातम्या …….**

**केवायसी**

केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि नागरिकांना वारंवार केवायसी करावं लागू नये यासाठी देशातल्या सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आज केलं. सेबीच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. देशातला एखादा शेअर बाजार, शेअर दलाल किंवा संबंधितांवर सायबर हल्ला झाला, तर त्यामुळे होणारं नुकसान भरून यायला मोठा काळ जाऊ शकतो. त्यामुळे सायबर हल्ले, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सेबीनं मजबूत यंत्रणा तयार करावी, अशी सूचना त्यांनी केली. सीमेपलीकडून होणाऱ्या गैरव्यवहारांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या नियामकांशी संपर्क वाढवावा, असंही सीतारमन यांनी सांगितलं. गुंतवणूकदारांमध्ये जागृती करण्यासाठीच्या सेबीच्या अभियानाचा प्रारंभ

यावेळी अर्थमंत्र्यांनी केला. देशातले सर्व शेअर बाजार, म्युच्युअल फंड संघटना आणि इतर संस्थांच्या मदतीनं हे अभियान राबवलं जाणार आहे.

**'मन की बात'**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १३३ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसंच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होई

**गहू खरेदी**

केंद्र सरकारनं सध्याच्या हंगामासाठी किमान हमीभावानं गहू खरेदी करण्याचं लक्ष्य १५ टक्क्यांनी वाढवून साडेचौतीस दशलक्ष टनावर नेलं आहे. यापूर्वी सरकारनं ३० दशलक्ष टन गहू खरेदीचं उद्दिष्ट ठेवलं होतं. अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याच्या उद्देशानं ही वाढ केल्याचं अन्न विभागाचे सचिव संजीव चोप्रा यांनी काल नवी दिल्लीत आटा उत्पादक महासंघाच्या वार्षिक गहू सर्वेक्षण अहवालाच्या प्रकाशनप्रसंगी सांगितलं. राज्यनिहाय गहू खरेदीचं लक्ष्यही वाढवण्यात आल्याचं ते म्हणाले.

**जनगणना**

जनगणना २०२७ साठी १-८-५-५ हा राष्ट्रीय निःशुल्क मदत क्रमांक सुरू केला आहे. देशभरातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये हा क्रमांक वापरता येणार आहे. या क्रमांकावरून गृहसूची आणि गृहगणना प्रक्रियेबाबत इंग्रजीसह प्रादेशिक भाषांमधून मार्गदर्शन उपलब्ध करून दिलं जाईल. जनगणनेच्या महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यात नागरिकांना सुलभतेनं सहभाग घेता यावा, आणि त्यांच्या शंकांचं निरसन करता याव या उद्देशानं ही सुविधा सुरु केली गेली आहे.

**इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन**

प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणी करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समिती - पीएमसी द्वारे प्रकल्पाच्या टप्प्यांची सर्व स्तरावर देखरेख, वास्तुविशारदाद्वारे उत्तम प्रकल्प संरचना त्याचप्रमाणे खाजगी सहकारी सहभाग- पीपीपी( पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) आणि अधिकाऱ्यांचे परफॉर्मन्स ऑडिट हे महत्त्वाचं आहे असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर मध्ये केले. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन- आयवा नागपूर शाखेतर्फे आज 24x7 वॉटर सप्लाय इंजीनियरिंग या डॉ. संजय दहासहस्र यांनी लिहिलेल्या पुस्तकाचं

अनावरण गडकरी यांच्या हस्ते स्थानिक हॉटेल सेंटर पॉईंट येथील झाले त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी इंडियन वॉटर वर्क्सच्या राष्ट्रीय अध्यक्ष मनीषा पलांडे यांची उपस्थिती होती. पाणी व्यवस्थापनातील बारकावे हे या पुस्तकात असून या पुस्तकातील संशोधन हे भविष्यातील यशकथा बनतील असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला कुठल्याही प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन समिती ही प्रकल्पाच्या सुरुवातीपासून तर समाप्तीपर्यंतच्या सर्व प्रक्रियाबाबत जबाबदार असली पाहिजे असं सांगून गडकरींनी विस्तृत प्रकल्प अहवाल -डीपीआर हा कुठलीही निविदा काढण्यापूर्वी व्यवस्थित अभ्यासण्याचे आवाहन बांधकाम क्षेत्रातील अधिकाऱ्यांना केले . नागपूर येथे ट्वेंटी फोर बाय सेवन पाणी हा प्रकल्प राबवला असे देखील त्यांनी यावेळी नमूद केलं . पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मध्ये काम करून असे प्रकल्प मुद्रीकरणाद्वारे नफ्यात आणणे आवश्यक आहे . पाणी व्यवस्थापनामध्ये देखील ज्या छोट्या योजना आहेत त्यासाठी बेरोजगार सुशिक्षित अभियंतांना गुणवत्ता पूर्ण कामे करण्यासाठी काही धनराशी देता येईल का याबद्दल देखील प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितलं . या कार्यक्रमाला जलव्यवस्थापन त्याचप्रमाणे जल अभियांत्रिकी क्षेत्रातील धोरणकर्ते ,विद्यार्थी ,व्यावसायिक तसेच तज्ञ उपस्थित होते.

**गोदा ते नर्मदा**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त गोदा ते नर्मदा जलयात्रेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज त्र्यंबकेश्वर इथं प्रारंभ झाला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. जलसंपदा विभागाने या यात्रेचं आयोजन केलं आहे. या यात्रेच्या दुसऱ्या तुकडीने अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मस्थानी ‘चौंडी’ इथून आज यात्रेला सुरुवात केली. ही यात्रा मध्यप्रदेशात महेश्वर पर्यंत जाणार आहे.

**त्रिस्तरीय समित्यांची स्थापना**

राज्यातल्या भटके-विमुक्त समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी तसंच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिस्तरीय समित्यांची स्थापना केल्याची माहिती, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी पत्रकाद्वारे दिली. राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावरच्या या समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्तांच्या तक्रारींचं निवारण तातडीने केलं जाईल, त्वरित कारवाई केली जाईल तसंच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल असं सावे म्हणाले. या तक्रारींचं निवारण वेळेत

व्हावं यासाठी स्पष्ट कार्यपद्धती ठरवण्यात आली आहे. प्राप्त तक्रारींवर १० दिवसांत कार्यवाही सुरू करणं बंधनकारक असेल. उपविभाग किंवा जिल्हा स्तरावर कार्यवाही न झाल्यास नागरिकांना राज्यस्तरीय समितीकडे दाद मागता येईल, असंही त्यांनी सांगितलं.

**आंदोलनाचा इशारा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला असून, याचा थेट परिणाम निकाल प्रक्रियेवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.शिक्षण मंडळाने अलीकडेच कर्मचाऱ्यांच्या बढती आणि बदलीसंदर्भातील नियमांमध्ये बदल करत कालमर्यादा दोन वर्षांवरून वाढवून चार ते सहा वर्षे केली आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. दरम्यान, बोर्ड कर्मचारी महासंघटनेचे उपाध्यक्ष विठ्ठल सरोदे यांनी प्रशासनाला कडक इशारा दिला आहे. सध्या राज्यातील नऊही विभागांत लाक्षणिक कामबंद आंदोलन सुरू असून, प्रशासनाने याकडे दखल न घेतल्यास येत्या २८ एप्रिलपासून राज्यभर पूर्ण कामबंद आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

**उपगटांत वर्गीकरण**

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती प्रवर्गाचे अ, ब, क अशा उपगटांत वर्गीकरण करण्याचा घेतलेला निर्णय बौद्ध समाजाने फेटाळून लावला आहे.रिपब्लिकन पार्टी (खोरीपा)चे अध्यक्ष ॲड. मिलिंद खोब्रागडे यांनी हा निर्णय अमान्य असल्याचे स्पष्ट केले आहे.तर पक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. प्रदीप बोरकर यांनी उपवर्गीकरण हा सामाजिक न्याय नसून वंचित समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे.दरम्यान, शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अन्यथा आंबेडकरी जनतेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**अकोला उष्णतेची लाट**

विदर्भात उच्चांकी उष्णतामान कायम असून, आज आणि उद्या अमरावती आणि अकोला जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.  उद्या हाच ऑरेंज अलर्ट वर्ध्यात देखील जारी करण्यात आलाय.  दरम्यान आज विदर्भात अकोला जिल्हा 45 अंश सेल्सिअसह सर्वात उष्ण ठरला. त्या पाठोपाठ अमरावती येथे 44. 8 इथं वर्धा इथं 44. 4 तर यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये 44 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.  नागपुरात आज 43. 4 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. येत्या 28 तारखेला विदर्भात नागपूरसह काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमानाची शक्यता वर्तवण्यात आली आहे अकोला जिल्ह्यात  जिल्ह्याचे तापमान

४५ अंशांपर्यंत गेल्याच्या पार्श्वभूमीवर, वाढत्या उष्णतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेता, विविध परीक्षा केंद्रांवर विद्यार्थी मदत कक्ष सुरू करण्याची मागणी गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे. उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून उष्माघाताचा धोका गंभीर स्वरूप धारण करत आहे. याची दखल घेत भंडारा जिल्हा प्रशासनाने ४४ विशेष कक्ष उभारून १६८ खाटांची सुविधा उपलब्ध करून नागरिकांच्या आरोग्यसुरक्षेला प्राधान्य दिले आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेमध्ये आज २ सामने खेळवले जाणार आहे. दुसरा सामना आज राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातला सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होणार आहे. तत्पूर्वी पहिला सामना दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्स दरम्यान होत असून दिल्ली कॅपिटल्स ने पंजाबच्या संघापुढे 265 धावा करण्याचं आवाहन ठेवलं आहे शेवटचे वृत्त हाती आलं तेव्हा पंजाब संघाच्या बिनबाद 43 धावा झाल्या होत्या

****